MVP's

## KSKW Arts, Science & Commerce College, Uttamnagar, Nashik.

# Department of Library

### Book Exhibition

### "Gender Sensitization"

### 23rd April 2019

On the occasion of " World Book Day" the college library has organized book Exhibition on the collection of ' Gender Sensitization". Hon Nanasaheb Mahale has inaugurate to the exhibition. Shree Ramdas Jagtap (trustee of Kusumagraj Pratishthan) and Smt. Tanvi Amit (Poetess of " Nishparna Phandi") was visited to the Exhibition.

More than 100 Books on gender sensitization, Third gender was exhibit in the exhibition. All the staff Members of Library co-operate for the success of programme. Near by 25 female & 10 male staff & students was visited to the exhibition and give the feedback about the efforts.



**Hon. Nanasaheb Mahale Inaugrate to the Book Exibition**






# वावरे महाविद्यालयात ग्रंथप्रदर्शन

■ नवीन नाशिक । दि.२२ प्रतिनिधी

२३ एप्रिल रोजी जागतिक पुस्तक दिनानिमित्य मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे संचालक नाना महाले यांच्या हस्ते कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन व ग्रंथपेटी संकलन नुकतेच संपन्न झाले. यावेळी दैनिक 'देशदूत'च्यावतीने कर्मयोगिनी पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल प्राचार्य सोनखासकर यांचा महाविद्यालयाच्यावतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी निष्पर्ण फांदीवरचे पक्षी संग्रहाच्या कवयित्री तन्वी अमित, कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे रामदास जगताप, दत्ता पाटील, प्राचार्य डॉ. ज्योत्स्ना सोनखासकर, उपप्राचार्य डॉ. ए. के. शिंदे, ग्रंथपाल योगिता फापाळे, प्रा. सोमनाथ घुले, प्रा. एच. एम. पाटील, डॉ. राहुल पाटील, श्रीमती एम. डी. हारक उपस्थित होत्या. या प्रदर्शनात स्री, पुरुष आणि तृतीयपंथी यांच्यावरील विविध ५० दुर्मिळ पुस्तकांचा समावेश असून ३० एप्रिल पर्यंत हे प्रदर्शन सुरु राहणार आहे. सर्व नागरिक, विद्यार्थी व समाजघटकांसाठी हे प्रदर्शन खुले असल्याची माहिती प्राचार्य सोनखासकर आणि संयोजक योगिता फापाळे यांनी यावेळी दिली. या प्रदर्शनात महाराष्ट्रातील तेजस्वी स्रीरत्ने, भारतीय स्री जीवन, स्री-पुरुष तुलना, स्रीवाद, स्रीचा आत्मशोध, स्रीजीवन, स्री- पुरुष नातेसंबंध, पुरुष अनुभवातला आकलनातला, मुलगा की मुलगी, होय, मी स्री आहे, बहुचर्चित मी हिजडा तसेच हिंदी आणि इंग्लिश भाषेतील पुस्तके उपलब्ध आहेत.

कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या ग्रंथ तुमच्या दारी या योजनेंतर्गत २०९व्या क्रमांकाची पेटी वावरे महाविद्यालयाला यावेळी प्रदान करण्यात आली. या पेटीत पु. ल. देशपांडे, प्र. के. अत्रे, सानिया, रणजीत देसाई, व्यंकटेश माडगुळकर, विजय तेंडूलकर, सानेगुरुजी, द्वारकानाथ संझगिरी, मारुती चित्तमपल्ली, बाबा भांड, श्री. ना. पेंडसे, द. मा. मिरासदार, शिवाजी सावंत, बाळ फोंडके, उत्तम कांबळे, व. पु. काळे, नीला सत्यनारायण, राजन गवस, अच्युत गोडबोले, अनिल अवचट आणि इतर जुन्या-नव्या मान्यवर लेखकांची शंभर पुस्तके उपलब्ध आहेत. विनायक रानडे यांच्या संकल्पनेतून २००७-०८ पासून भारतातील सर्व प्रमुख शहरांसह जगातील देशात ही ग्रंथपेटी योजना पोहोचली असून सुमारे अडीच कोटी रुपयांची ग्रंथ संपदा असल्याची माहिती रामदास जगताप यांनी दिली. तन्वी अमित यांनी वाचत राहा असे सांगताना वाचन संस्कृती दुर्मिळ होत असताना अशा जागरूक महाविद्यालयात येता आल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

यावेळी अध्यक्षीय मनोगतात डॉ. सोनखासकर यांनी ही पुस्तके मी आणि आमचे कर्मचारी वाचतीलच पण पुढच्यावेळी जेव्हा आपण ही पेटी बदल करू त्यावेळी आम्ही तुम्हाला आमच्या महाविद्यालयाच्या वतीने एक ग्रंथ पेटी देऊ असे आश्वासन दिले. त्यांनी आजची वाचन संस्कृती यावर सविस्तर भूमिका मांडताना वाचनासंबंधीच्या अपेक्षा व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राहुल पाटील यांनी केले. आभार प्रा. दिपाली सूर्यवंशी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पूजा बिरारी, माया साळुंखे, सायली जमादार आदींनी प्रयत्न केले.

News Local Newspaper " **Deshdhut**"